



# स्नेहवन वार्ता

एक आशेचा किरण

मार्च २०२४

संपादन व मार्गदर्शन : नयना निर्गुण
संकलन व लेखन : श्रीकांत, वैभव, दीपक


या सुखांनो साद घालु
दु:खितांच्या जिवनी...
फुल नाही तर पाकळी होवू।
दु:खितांच्या जिवनी सुगंध देवू।।


वेबसाईट- www.snehwan.in | फेसबुक- www.facebook.com/snehwan | Instagram- www.instagram.com/ashok.snehwan | पत्ता : स्नेहवन, कोयाळी फाटा, कोयाळी फॉरेस्ट, कोयाळी तर्फे चाकण, ता. खेड, जि. पुणे - ४१०५०१


## आणखी एक पाऊल स्वयंपूर्णतेकडे...!

### बायोगॅसची नवीन प्रणाली 'स्नेहवन'मध्ये कार्यान्वित



सन २०१९ पासून 'स्नेहवन'मध्ये 'झिरो वेस्ट'वर काम केले जाते. स्वयंपाकघरामधून निघणारा सगळा ओला कचरा बायोगॅस तयार करण्यासाठी वापरला जातो.

आतापर्यंत संस्थेतील बायोगॅस प्रकल्पातून सुमारे पाच हजार लिटर गॅस तयार होत होता. संस्थेतील साठ लोकांचे ९० टक्के जेवण या गॅसवर तयार केले जात होते. येत्या वर्षात स्नेहवनमधील मुलांची संख्या वाढविण्याचा प्रयत्न सुरू असल्याने गॅसची गरज वाढणार आहे. स्वयंपाकघरातील यंत्रणाही वाढवावी लागणार आहे. त्याचा पहिला टप्पा म्हणून, बायोगॅसची नवीन वेगळी प्रणाली 'स्नेहवन'मध्ये बसवण्यात आली आहे. त्या क्षेत्रातील तज्ज्ञ आल्हाद देशपांडे यांनी ही यंत्रणा विकसित केली आहे.

बायोगॅस, गोबर गॅसचे प्रकल्प केमिकल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आहेत. मात्र 'स्नेहवन'मधील आठवी, नववीतील मुले या प्रकल्पावर काम करतात. गाईच्या शेणापासून, स्वयंपाकघरातील कचऱ्यापासून गॅस तयार करणे, त्याचा पीएच तपासणे, त्यातून निघणाऱ्या स्लरीचा पुनर्वापर करणे, आदी गोष्टी संस्थेतील मुलांना प्रात्यक्षिकासह शिकवल्या जातात.

पर्यावरणपूरक जीवनशैली, जास्तीत जास्त नैसर्गिक संसाधनांचा वापर, झिरो कार्बन वेस्ट या सर्व गोष्टी येथील मुलांना दैनंदिन कृतींमधून शिकवल्या जातात.

## पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक नानासाहेब जाधव यांचा मुलांशी संवाद



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे, पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक नानासाहेब जाधव, तसेच संघाचे प्रांत कार्यकारिणी सदस्य हेमंत हरहरे यांनी 'स्नेहवन'ला भेट देत येथील मुलांशी संवाद साधला.

नानासाहेब जाधव यांनी कृषी अभियांत्रिकीमधील एम.टेक. पदवी प्राप्त केलेली असून माती आणि पाणी संवर्धन या विषयांचा त्यांचा विशेष अभ्यास आहे. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठात त्यांनी प्राध्यापक आणि शास्त्रज्ञ म्हणून काम केले आहे.

'मैं अपने लिये नहीं अपनों के लिए हूं, हा भाव मनात रुजवावा,' असे सांगत राष्ट्रासाठी संपूर्ण आयुष्य समर्पित करण्याची भावना मनामनात, घराघरात रुजवावी, भारतमातेच्या सेवेसाठी सदैव तत्पर राहावे. राष्ट्र प्रथम हा विचार सदैव जपावा, असे आवाहन त्यांनी मुलांना केले.

# श्रमदान, बौद्धिक मंथन आणि खेळाचा आनंद

### एआयटी आणि अजिंक्य डी. वाय. पाटील कॉलेजचे हिवाळी शिबिर





संस्थेच्या प्रांगणात श्रमदानातून विविध कामे, तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून बौद्धिक मंथन आणि कॉलेजमधील ताईदादांबरोबर अभ्यास आणि खेळ... अशा विविध उपक्रमांनी फेब्रुवारीचे पहिले दोन आठवडे 'स्नेहवन'चे आवार गजबजून गेले होते. निमित्त होते लागोपाठ झालेल्या दोन महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरांचे.

दिघी येथील आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसांचे निवासी शिबिर १ फेब्रुवारीपासून सुरू झाले. शिबिरात सुमारे साठ विद्यार्थी सहभागी झाले होते. 'स्नेहवन'च्या आवारात या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी श्रमदान केले. संस्थेतील मुलांबरोबर विविध विषयांवर चर्चा केली. त्यांना काही नवीन विषय शिकविले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे, पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक नानासाहेब जाधव यांचे विचार ऐकण्याची संधी मुलांना या शिबिरात मिळाली. एआयटी महाविद्यालयाचे संचालक ब्रिगेडियर अभय भट यांनी शिबिरादरम्यान संस्थेला भेट देऊन प्रकल्पांची पाहणी केली. प्रा. विशाल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर झाले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, अजिंक्य डी. वाय. पाटील स्कूल ऑफ इंजिनिअरिंग, लोहगाव आणि डॉ. डी. वाय. पाटील स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी यांच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार हिवाळी शिबिर ९ फेब्रुवारीपासून सात दिवस 'स्नेहवन'मध्ये झाले. या शिबिराचे उद्घाटन आदिवासी विकास विभागातील अधिकारी पल्लवी मुळे आणि शालेय पोषण अधिकारी मोहन मुळे यांच्या हस्ते, 'स्नेहवन'चे संस्थापक अशोक देशमाने यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

या शिबिरात महाविद्यालयातील सुमारे ७० मुलांनी श्रमदान केले. शिवाय संस्थेतील मुलांना वेगवेगळे विषय शिकविले, त्यांच्याशी गप्पा मारल्या. त्यांच्याबरोबर खेळण्याचा आनंदही लुटला.

सकाळी श्रमदान, मुलांना शिकवणे, दुपारी वेगवेगळ्या विषयांवर तज्ज्ञ मान्यवरांचे मार्गदर्शन आणि सायंकाळी मुलांबरोबर खेळ, हरिपाठ, भगवद्गीता असा या शिबिराचा दिनक्रम होता.

> 'स्नेहवन'मधील मुलांबरोबरचा संवाद आनंददायी होता. इथे आम्ही लवचिकतेचा धडा शिकलो. आव्हानांचा सामना कसा करावा, त्याचबरोबर कौशल्य आणि जागरूकता कशी वाढवावी, हे अशोकदादा यांच्याकडून शिकलो. येथील मुलांशी भावनिक नाते तयार झाल्यामुळे शिबिराच्या समारोपानंतर येथून पाय निघेना. संस्थेतील शिबिरामुळे आमचा जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाला वेगळा आकार मिळाला.
>
> **- तनिष्का पाटील,**
> अजिंक्य डी. वाय. पाटील महाविद्यालय

> 'स्नेहवन'मधील मुलामुलींचे कठोर परिश्रम आणि समर्पणाने खूप प्रेरणा मिळाली. आर्थिक पाठबळ नसलेल्या किंवा ज्यांना शिक्षण मिळू शकत नाही, अशा मुलांचे भवितव्य घडविणारे अशोकसर आणि स्नेहवन टीमचे मनापासून कौतुक. इतरांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याची प्रेरणा त्यांच्याकडून मिळाली. संस्थेतील सकारात्मक वातावरण प्रेरणादायी आहे. काही काळ का होईना या संस्थेचा भाग होण्याची संधी मिळाली, त्याबद्दल कृतज्ञ आहे.
>
> **- विशाल नलगे,**
> अजिंक्य डी. वाय. पाटील महाविद्यालय

स्नेहवन वार्ता
एक आशेचा किरण
मार्च २०२४

## जनमत

# वंचित मुलामुलींना स्वयंपूर्ण बनविणारे 'स्नेहवन'

**मुरलीधर देशपांडे,** मा. अध्यक्ष, श्री कसबा गणपती ट्रस्ट, पुणे.

आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांच्या संगोपनाची जबाबदारी उचललेल्या जिद्दी, होतकरू तरुणाने चालवलेल्या "स्नेहवन" या संस्थेस भेट देण्याचा योग जुळून आला. खरंच कौतुकास्पद कार्य आहे. शेतकऱ्याच्या आत्महत्येनंतर त्याच्या कुटुंबाची अवस्था पाहून नुसते अश्रू न गाळता, अशा शेतकऱ्यांच्या मुलांना आधार देऊन त्यांना स्वयंपूर्ण बनवण्यासाठी श्री. अशोक देशमाने या शेतकऱ्याच्या मुलाने उचललेला विडा म्हणजे स्नेहवन संस्था.

ही संस्था सुरुवातीला भोसरी येथे दोन खोल्यांमध्ये चालायची. पण या तरुणाची जिद्द, कर्तृत्व पाहून तिथेच दवाखाना चालवणारे डॉ. कुलकर्णी यांनी आळंदीजवळची स्वतःची दोन एकर जागा या संस्थेस दान केली. या तरुणाने जिद्दीने या माळरान असलेल्या जागेत ही संस्था भव्य स्वरुपात उभी केली. सध्या या संस्थेत साधारणपणे साठ मुले- मुली निवासी आहेत. त्यांचे राहणे, जेवण, शिक्षण याबरोबरच त्यांना शेतीकाम, शिवणकाम, गवंडीकाम, सुतारकाम, रंगकाम, संगीत, निरनिराळी वाद्ये वाजवणे, संगणकज्ञान आदी सर्व प्रकारचे शिक्षण दिले जाते. ही मुलेच संस्थेची, तेथील गाई- गुरांची स्वच्छता वगैरे कामेही बघतात. या संस्थेने गोबर गॅस, खत प्रकल्पही उभे केले आहेत. आम्ही या संस्थेस भेट देऊन आलो, आपणही एकदा अवश्य भेट द्यावी, हाच या पत्राचा प्रामाणिक उद्देश. या संस्थेस आणि आमच्या तरुण मित्रास हार्दिक शुभेच्छा...!

## सुहृदांच्या भेटी

### पत्रकार प्रशांत अनासपुरे

पत्रकार प्रशांत अनासपुरे यांनी स्नेहवनला भेट देऊन शुभेच्छा दिल्या. श्री. अनासपुरे हे झी टीव्ही मराठीचे सेलिब्रेटी समन्वयक म्हणून काम पाहतात.




### ज्येष्ठ सनदी अधिकारी लीना मेहेंदळे

महाराष्ट्र राज्याच्या माजी अतिरिक्त मुख्य सचिव, लेखिका, गोव्याच्या माजी मुख्य माहिती अधिकारी लीना मेहेंदळे यांनी स्नेहवनला भेट दिली. त्यांनी प्रकल्पाची पाहणी केली आणि समाधान व्यक्त केले.



# वाणीसंगमच्या शाळेला स्नेहवनकडून २ संगणक



ग्रामीण भागातील मुलांना संगणक शिकण्याची इच्छा असते, पण सर्वच शाळांमध्ये ती सुविधा नसते. हाच विचार करून परभणी जिल्ह्यातील सोनपेठ तालुक्यातील वाणीसंगम येथील जिल्हा परिषद शाळेतील मुलांना शिकण्यासाठी 'स्नेहवन'तर्फे संस्थेमधील दोन संगणक देण्यात आले.

या शाळेतील शिक्षक अतिशय मेहनती आहेत आणि मुलांना संगणक शिकण्याची खूप इच्छा आहे, असे 'स्नेहवन'चे हितचिंतक प्रल्हाद पायघन यांनी सांगितले होते. त्यानुसार हे संगणक या शाळेला देण्यात आले. आपल्याकडे जे थोडे जास्त आहे, ते दुसऱ्यांना देण्याचा संस्कार मुलांमध्ये रुजावा, याही हेतूने हा खारुताईचा वाटा 'स्नेहवन'कडून या मुलांपर्यंत पोचविला.

## यशवंत व्हा



**लखन राठोड**

राम व लखन ही जालना जिल्ह्यातील जाम समर्थ तांड्यावरील शेतमजुराची मुले. सन २०१३ पासून सलग तीन वर्षांच्या दुष्काळामुळे शेतीतील कामे बंद पडली, मजुरीची कामे मिळेनाशी झाली. कामाच्या शोधात कल्याणला आले. खूप प्रयत्नांतून वडिलांना वीटभट्टीवर काम मिळाले तर आई लोकांची धुणीभांडी करू लागली. दोन्ही मुलांच्या शिक्षणासाठी पैसे नव्हते. मुले हुशार असूनही एक वर्ष त्यांना घरीच बसावे लागले. ही बाब 'स्नेहवन'ला समजली, तेव्हा संस्थेने दोन्ही मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारले. सन २०१६ मध्ये ही मुले संस्थेत आली. लखन यंदा दहावीची परीक्षा देत आहे, तर राम अकरावीत शिकत आहे. लखनला भविष्यात लोकांचे प्रबोधन करण्यासाठी कीर्तनकार, व्याख्याता व्हायचे आहे. या मुलांच्या स्वप्नांना दिशा मिळावी, पंखांना बळ मिळावे, यासाठी स्नेहवन प्रयत्न करीत आहे. आपल्याही शुभेच्छा आणि आशीर्वाद या मुलांच्या पाठीशी असू द्या.

## यशवंत व्हा



**सागर बेद्रे**

बीड जिल्ह्यातील छोट्याशा गावातून सात वर्षांपूर्वी स्नेहवनमध्ये आलेला सागर बेद्रे सध्या बारावीची (कॉमर्स) परीक्षा देत आहे. आज सागरचे कुटुंब सावरत आहे. त्याचा लहान भाऊ गणेशही स्नेहवनमध्ये शिकतो. मागच्या वर्षी गणेशला दहावीत ८६ टक्के गुण मिळाले. तो यंदा अकरावीत आहे.

# बुद्धिबळ वर्ग सुरू

'स्नेहवन'मध्ये मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवले जातात. फेब्रुवारी महिन्यापासून मुलांसाठी बुद्धिबळ वर्ग सुरू केला आहे. व्हिक्टोरिअस चेस अकादमी संस्थेतील प्रशिक्षक मुलांना हा खेळ शिकवणार आहेत.



# मावळ्यांच्या वेशात शिवरायांचा जयजयकार



छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती स्नेहवनमध्ये उत्साहात साजरी झाली. संस्थेतील मुलांनी मावळ्यांचा वेश परिधान करून छत्रपती शिवाजी महाराजांचा जयजयकार केला. शिवजयंती कार्यक्रमासाठी संस्थेतील मुलांची सकाळपासूनच लगबग सुरू होती.

महाराजांच्या युद्ध चातुर्याविषयीचे नाटक काही मुलांनी सादर केले. काही मुलांनी महाराजांच्या शौर्याची गाथा आपल्या वक्तृत्वातून मांडली. अफझलखानाचा वध, शायिस्तेखानाची बोटे छाटली, आग्र्याहून सुटका हे प्रसंग मुलांनी भाषणातून सांगितले. यावेळी हातात भगवा झेंडा घेऊन 'जय भवानी, जय शिवाजी' अशा घोषणा देत मुलांनी जल्लोष केला ग्लोबल क्लासरुम प्रकल्पांतर्गत जपान आणि श्रीलंकेहून आलेल्या परदेशी विद्यार्थिनींही छान साडी परिधान करून कार्यक्रमात सहभागी झाल्या.

